PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Eka peksha Ek
Year: 1990

Song: Sada sarvada yog tujha
Lyricist:

सदा सर्वदा योग तुझा घडावा
तुझे कारणी देवी देह माझा पडावा
रूपवती गुणवती प्यारी किती
बायको माझी प्यारी किती
जीवाला या बायको माझी प्यारी किती
जोडा आमचा हरिशचंद्र तारामती
जोडा आमचा हरिशचंद्र तारामती
रूपवती गुणवती प्यारी किती
बायको माझी प्यारी किती
जीवाला या बायको माझी प्यारी किती
जय बोला प्रिय पत्नीची
या लसणीच्या चटणीची
जय बोला प्रिय पत्नीची
या लसणीच्या चटणीची

निशीदिन तव गुणगान करी मी
शरण तुला किती जाऊ तरी मी
तू तर बंडलबाज खरी मी
भटकत तू दिनरात घरी मी
ए ए ए अनू हास ना जरा
रूसवा सोड ना
अनू हास ना जरा रूसवा सोड ना
अनू राग हा तुझा गं किती गोड ना
अनू राग हा तुझा गं किती गोड ना
राणी हास ना जरा रूसवा सोड ना
अनू हास ना जरा रूसवा सोड ना
वेळेवरी थापा मारी वा रे वा पती
वेळेवरी थापा मारी वा रे वा पती
रूपवती गुणवती प्यारी किती

बायको माझी प्यारी किती
जीवाला या बायको माझी प्यारी किती
जय बोला प्रिय पत्नीची
या लसणीच्या चटणीची
जय बोला प्रिय पत्नीची
या लसणीच्या चटणीची
झरझर झरझर भाजी कापू
मिरची चिरूनी कांदा कापू
गॅस पेटवू भांडे ठेवू
वात वाढवू तेल ही टाकू
वात वाढवू तेल ही टाकू
तवा लागला झटकन तापू
पोळ्या लाटू चटणी वाटू
असा भोपळा करकर कापू
पडवळ वांगी चवळी शेपू
अरे पडवळ वांगी चवळी शेपू
शिकरण करण्या केळी सोलू
दुधात थोडे केशर घालू
अरे स्वयंपाकाची लज्जत न्यारी
चल ये दोघे मिळूनी चाखू
चल ये दोघे मिळूनी चाखू
चल ये दोघे मिळूनी चाखू
तुझ्यापुढे माझी आता चालेना मती
तुझ्यापुढे माझी आता चालेना मती
हां रूपवती गुणवती प्यारी किती
बायको माझी प्यारी किती
जीवाला या बायको माझी प्यारी किती
जोडा आमचा हरिशचंद्र तारामती
जोडा आमचा हरिशचंद्र तारामती

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*